बीड । सोमवार
०५.०५.२०२५
वर्षे : ५ अंक : ३४
किंमत : ३ रू. पाने : ४

दैनिक ● www.marathwadapatra.com

# मराठवाडा पत्र

■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■




dailymarathwadapatra2021@gmail.com RNI:Reg.NO.MAH/MAR/2021/80074 Post:Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 Mob:9822152955 

# पीएम किसानच्या २० व्या हप्त्यासाठी केंद्र सरकारची नवीन अट

# फार्मर आयडी असेल तरच मिळणार २००० रुपये

**पुणे । प्रतिनिधी**

शेतकऱ्यांसाठी सुरू करण्यात आलेली प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजना आता अधिक पारदर्शक आणि प्रभावी करण्यासाठी केंद्र सरकारने पाऊल उचलली आहेत. या योजनेचा २० वा हप्ता जून २०२५ मध्ये शेतकऱ्यांच्या खात्यात जमा होणार आहे. मात्र यावेळी केंद्र सरकारने एक महत्त्वाचा निर्णय घेतला असून, फक्त फार्मर आयडी' असलेल्या शेतकऱ्यांनाच हा हप्ता मिळणार असल्याची माहिती समोर आली आहे. याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, आतापर्यंत पीएम किसान योजनेच्या लाभार्थ्यांमध्ये



**● काय आहे फार्मर आयडी ?**

**फार्मर आयडी म्हणजे शेतकऱ्याची ओळख पटवणारा एक विशिष्ट क्रमांक, जो डिजिटल स्वरूपात तयार केला जातो. सरकार शेतकऱ्यांची माहिती एका केंद्रीकृत डेटाबेसमध्ये संकलित करत आहे आणि प्रत्येक शेतकऱ्याला एक युनिक आयडी दिला जातो. या आयडीमध्ये शेतकऱ्याचे नाव, आधार क्रमांक, शेतीचे क्षेत्रफळ, पीक पद्धती, बँक खाती आणि इतर माहिती समाविष्ट असते.**

अनेक अपात्र व्यक्तींचा समावेश झाल्याचे उघड झाले आहे. यामुळे योजनेचा योग्य लाभ खऱ्या गरजू शेतकऱ्यांपर्यंत पोहोचत नव्हता. आता फार्मर आयडी'च्या अटीनंतर, अपात्र व्यक्ती या योजनेपासून आपोआप वगळल्या जाणार असून खऱ्या लाभार्थीपर्यंत याचा लाभ पोहचणार आहे. फक्त फार्मर आयडी लिंक केलेल्या खात्यांनाच पैसे मिळणार आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांनी लवकरात लवकर आपली माहिती पीएम किसान पोर्टलवर अद्ययावत करावी, आणि फार्मर आयडी जनरेट केला आहे का याची खात्री करावी.

# दारूच्या नशेत बापाने केला मुलाचा खून

## माजलगावजवळील खानापूर येथील खळबळजनक घटना

**माजलगाव । प्रतिनिधी**

माजलगाव शहराजवळील खानापूर येथे दारूच्या नशेत बापाने आपल्या मुलाचा लाकडी दांड्याने डोक्यात मारून खून केल्याची धक्कादायक घटना रविवारी सकाळी उघडकीस आली. रोहीत गोपाळ कांबळे (वय अंदाजे २५) असे मृत युवकाचे नाव असून, गोपाळ विठ्ठल कांबळे असे संशयित आरोपी बापाचे नाव आहे.



प्राथमिक माहितीनुसार, बाप आणि मुलाला दारूचे व्यसन होते. नेहमीच दारू आणण्याच्या कारणावरून त्यांच्यात वाद होत असत. आठवडाभरापूर्वी रोहीत याने ▶▶ उर्वरित पान २ वर

**● दारूच्या नशेने आणखी एक कुटुंब उद्ध्वस्त**

**गेल्या काही दिवसांत बीड जिल्ह्यात दारूच्या नशेत नातेवाईकांमध्ये झालेल्या वादांमुळे अनेक हत्या घडल्या आहेत. अंबाजोगाई तालुक्यातील येल्डा येथे मुलाने आईचा, परळीत पुतण्याने चुलतीचा खून केला, तर माजलगावात ढाबा चालकाचा खून दारूच्या बिला कारणावरून झाला होता. आता खानापूर येथील ही घटना त्याच मालिकेतील भीषण वास्तव मांडते. दारूच्या व्यसनामुळे कुटुंब उद्ध्वस्त होत असून, आप्तस्वकीयांवर हल्ला करण्याच्या घटना वाढत आहेत. व्यसनमुक्तीसाठी व्यापक जनजागृती आणि कठोर उपाययोजना करण्याची गरज समाजासमोर उभी आहे.**

# धनादेश वटला नाही, आरोपीस धनादेशाच्या डबल दंडाची व पाच महिने कारावासाची शिक्षा : ॲड. शशिकांत सावंत

**बीड । प्रतिनिधी**

दिनांक ३/५/२०२५ रोजी मा. प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारी साहेब बीड यांनी कलम १३८ निगोशिएबल इन्स्टुमेंन्ट ॲक्ट अन्वय आरोपी कैलास दत्तात्रय सुरवसे यांना अनादरीत धनादेशाप्रकरणी धनादेशाच्या रकमेच्या डबल दंडाची शिक्षा त्याचप्रमाणे पाच महिन्याचे करावासाची शिक्षा सुनावलेले आहे. सदर प्रकरणी फिर्यादी परमेश्वर रामभाऊ जमदाडे यांनी मा. प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारी साहेब बीड यांच्या न्यायालयामध्ये समरी केस नंबर २६४३/२०१५ परमेश्वर विरुद्ध कैलास धनादेशाप्रकरणी प्रकरण दाखल केले होते सदर



प्रकरणांमध्ये आरोपी कैलास सुरवसे यांनी फिर्यादी यांना त्यांच्याकडे असणाऱ्या उसनवार रकमेच्या बदल्यात रक्कम रुपये १८०००० चा.धनादेश दिला होता सदरचा धनादेश वटवण्यासाठी बँकेत गेला असता सदरचा धनादेश आरोपीच्या खात्यावर पुरेशी रक्कम शिल्लक नसल्याने अनादरित झाला होता, म्हणून मा. न्यायालयात खटला दाखल करण्यात आला सदर प्रकरणात फिर्यादीच्या वतीने युक्तिवाद ग्राह्य धरून मा. न्यायालयाने आरोपी कैलास सुरवसे यास धनादेशाच्या डबल रक्कम ३६०००० रु. उदंड व पाच महिन्यांच्या करावासाची सजा दिलेली आहे, फिर्यादीच्या वतीने ॲड. शशिकांत सावंत यांनी बाजू मांडली, त्यांना ॲड. अभिषेक बहिर, ॲड. माऊली डाके, ॲड. प्रदीप दराडे, ॲड. राजकुमार धरणे, ॲड. मुकुंद लोणकर, ॲड. राम खोसे यांनी सहकार्य केले.

# बारावीचा निकाल आज; बोर्डाच्या वेबसाईटशिवाय निकाल आणखी कुठे पाहता येणार ?, जाणून घ्या संपूर्ण माहिती

**बीड । प्रतिनिधी**

राज्यातील बारावीचा निकाल, ५ मे रोजी दुपारी १ वाजता ऑनलाईन जाहीर होणार आहे. महाराष्ट्र राज्य उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने याबाबत अधिकृत माहिती दिली आहे. निकाल जाहीर झाल्यानंतर विद्यार्थ्यांना ६ मेपासून त्यांच्या महाविद्यालयांमधून गुणपत्रिकेचे वाटप करण्यात येणार आहे. महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने (MSBSHSE) महाराष्ट्र बोर्डाने फेब्रुवारी ते मार्च २०२५ या कालावधीत दहावी व बारावीच्या परीक्षा घेतल्या होत्या. आता परीक्षेच्या निकालासंदर्भात अधिकृत अधिसूचना प्रसिद्ध केली आहे. या अधिसूचनेनुसार, राज्याचा बारावीचा निकाल उद्या ५ मे रोजी दुपारी पत्रकार




परिषदेद्वारे जाहीर करण्यात येणार आहे. निकाल जाहीर झाल्यानंतर विद्यार्थी mahresult.nic.in या अधिकृत संकेतस्थळावर आपली गुणपत्रिका ऑनलाईन पाहू आणि डाऊनलोड करू शकतील.

**● खालील संकेतस्थळावर पाहता येणार निकाल**

1. mahresult.nic.in, 2. www.mahahsscboard.in

मंडळाच्या वेबसाईटशिवाय निकाल कुठं पाहावा? 3. http://hscresult.mkcl.org, 4. https://results.digilocker.gov.in, 5. http://results.targetpublications.org

▶▶ उर्वरित पान २ वर

# पहलगामच्या दहशतवाद्यांना मदत करणाऱ्याचा मृत्यू, थेट नदीत मारली उडी!

**वृत्तसंस्था**

पहलगामच्या दहशतवादी हल्ल्यासंदर्भात आता मोठी माहिती मिळत आहे. मिळालेल्या माहितीनुसार हा हल्ला करणाऱ्या दहशतवाद्यांना ज्या व्यक्तीने रसद पुरवली, त्याने नदीत उडी मारून स्वत:ला संपवलं आहे.

नदीत उडी मारतानाचा प्रसंग कॅमेऱ्यात कैद- दहशतवाद्यांना



दहशतवाद्यांना मदत केली, आता नदीत उडी!

रसद आणि अन्न दिल्याची कबुली या आरोपीने दिली होती. दहशतवाद्यांच्या स्थळावर घेऊन जाताना आरोपी पळाला. पळ काढून त्याने विश्वा नदीत उडी म ारली, असे सांगितले जात आहे. विशेष म्हणजे या आरोपीने नदीत उडी मारतानाचा प्रसंग कॅमेऱ्यात कैद झाला आहे. इम्तियाज अहमद मगरे असं या आरोपीचं नाव आहे.

३ मे रोजी पोलिसांनी घेतलं होतं ताब्यात- इम्तियाज मगरे याला पोलिसांनी ३ मे रोजी ताब्यात ▶▶ उर्वरित पान २ वर

## सरपंच व ग्रामसेवक यांनी लाखो रुपयांच्या भ्रष्टाचार केल्याने हरिभाऊ शेळके आज उपोषणाला बसणार



**बीड । प्रतिनिधी**

बीड तालुक्यातील जवळच असलेल्या वांगी येथील ग्रामसेवक तलाठी व सरपंच यांनी संगणमत करून नाली रस्ते पथदिवे शाळेचे रंगोटी अशा अनेक कामे न करताच बिल उचलून खाल्ली आहेत त्या विरोधात माननीय जिल्हाधिकारी पंचायत शिक्षण अधिकारी ▶▶ उर्वरित पान २ वर

# रोहयोचे नागपूर आयुक्त ६ मे रोजी बीड जिल्ह्यात

## माजलगाव, वडवणी, बीड तालुक्यातील कामांची करणार पाहणी

**बीड । प्रतिनिधी**

जिल्ह्यामध्ये गेल्या वर्षभरात रोजगार हमी योजनेअंतर्गत मोठ्या प्रमाणात कामे झाली आहेत. या कामाची पाहणी करण्यासाठी रोहयोचे नागपूर आयुक्त ६ मे रोजी जिल्ह्याच्या दौऱ्यावर आहेत. कामाची पाहणी केल्यानंतर जिल्हा नियोजन सभागृहामध्ये दुपारी २ वाजता सर्व अधिकाऱ्यांची आढावा बैठक घेणार आहेत. दबीड जिल्ह्यामध्ये गेल्या वर्षभरात वैयक्तिक सिंचन विहिरी, शेततलाव, फळबाग यासह इतर रोहयोची कामे करण्यात आलेली आहेत. या कामाची पाहणी करण्यासाठी रोहयोचे नागपूर आयुक्त हे दि.६ मे रोजी बीड जिल्ह्याच्या दौऱ्यावर आहेत. ते माजलगाव, वडवणी, बीड या तालुक्यातील कामाची पाहणी कारणार आहेत. कामाची पाहणी झाल्यानंतर सर्व जिल्हास्तरीय व तालुकास्तरीय गटविकास अधिकारी, तहसीलदार, सर्व सामाजिक वनीकरण, जिल्हा रेशीम कार्यालय, जिल्हा अधिक्षक, बीड तालुका कृषी अधिकारी यांची आढावा बैठक जिल्हाधिकारी कार्यालय, नियोजन सभागृहात दुपारी २ वाजता घेणार आहेत.

# ... नाहीतर तुझे 18 तुकडे करेन

## धनंजय मुंडेंकडून करुणा मुंडेंना जीवे मारण्याची धमकी ?

**मुंबई । प्रतिनिधी**

मंत्रिपदाचा राजीनामा दिलेल्या धनंजय मुंडेंची आम दारकी रद्द होण्यासाठी करुणा मुंडे मैदानात उतरल्या आहेत. त्यांनी धनंजय मुंडेंची आमदारकी रद्द करण्यासाठी न्यायालयात याचिका दाखल केली आहे.

तुझे १८ तुकडे करुन तुला संपवेन अशी धमकी धनंजय मुंडे यांनी दिल्याचा दिल्याचा दावा करुणा मुंडे यांनी केला आहे. याचे कॉल रेकॉर्डिंग असून लवकरच कोर्टात सादर करणार असल्याचे त्यांनी साम टिव्हीता दिलेल्या मुलाखतीत म्हटले आहे. करुणा मुंडे म्हणाल्या की, धनंजय मुंडे यांचे लोक मला सतत फोन कॉल, मेसेजेस करुन धमकी देत आहेत. तुझे आंघोळ करतानाचे फोटो व्हायरल करु, तुझ्या मुलीला उचलून घेऊन जाऊ अशा धमक्या या लोकांकडून दिल्या जात असल्याचे करुणा मुंडे यांनी सांगितले. त्या म्हणाल्या की,



धनंजय मुंडे यांनी देखील मला तुझे १८ तुकडे करीन अशीजीवे मारण्याची धमकी दिली आहे. पुढे बोलताना त्या म्हणाल्या की, मी या धमक्यांना घाबरणारी नाही, त्यांनी माझे तुकडे करायचे सोडा, माझ्या केसाला तरी धक्का लावून दाखवावा, असं प्रतिआव्हान त्यांनी दिले.

दरम्यान शनिवारी धनंजय मुंडे हे कोर्टाच्या आदेशांना न जुमानता आपल्याला दररोज धमक्या आणि आर्टिफिशियल इंटेलिजन्सच्या (एआय) म ाध्यमातून मॉर्फ केलेले व्हिडिओ आणि फोटो पाठवून आपला छळ करत असल्याची लेखी तक्रार करूणा मुंडे यांनी कोर्टात केली आहे. कोर्टानं पोटगीबाबत दिलेल्या आदेशांनुसार ६० लाखांची वसुली आणि करूणा यांच्या मालकीच्या संपत्तीची विक्री करू नये, असे आदेश देण्याची मागणी करत करूणा मुंडे यांनी वांद्रे कोर्टात केली आहे.



# मराठ्यांच्या इतिहासातील महानायक-नरवीर शिवाजी काशिद

**(नाभिक नरविर शिवाजी काशिद जयंती ५ मे विशेष लेख)**
**जन्म :दिनांक ५ मे १६३०. मृत्यु : दिनांक १३ जुलै १६६०**

स्वराज्य स्थापनेच्या कार्यात शिवरायांच्या पराक्रमी अनुयायांबरोबरच त्यांच्या गुप्तहेर खात्याचा सुद्धा अत्यंत उपयुक्त सहभाग होता. स्वकीय विरोधक व उघड शत्रू यांच्या हालचाली,दूरवरच्या प्रदेशातील परिस्थिती इ. माहिती वेळच्या वेळी मिळण्यावर राजकीय आणि सैनिकी यश अवलंबून आहे हे ओळखून शिवराय गुप्तहेर खात्यावर भरपूर पैसा खर्च करत. शत्रूच्या हालचाली आणि गुप्त कारवाया तसेच शत्रुप्रदेशातील संपन्न शहरे,खजिन्याच्या जागा,हल्ल्यासाठी जाण्याचा आणि परत येण्याचा मार्ग इत्यादी गोष्टींची गुप्तहेरांमार्फत खडानखडा माहिती मिळवून शिवरायांनी अनेक धाडसी हल्ले करून शत्रूंची शहरे लुटली. छत्रपती शिवरायांचे गुप्तहेर खाते अतिशय कार्यक्षम होते. या गुप्तहेरांपैकी एक नाव म्हणजे नरवीर शिवाजी काशिद. छत्रपती शिवरायांच्या रयतेच्या स्वराज्यासाठी आपल्या प्राणाची बाजी लढवणारे गुप्तहेर नरवीर शिवाजी काशिद हे मराठ्यांच्या इतिहासातील एका महानायकच.

ऐतिहासिक पार्श्वभूमी :- छत्रपती शिवरायांनी दिनांक १० नोव्हेंबर १६५९ रोजी प्रतापगडावर अफ़जलखानास व अफ़जलखानाचा वकील कृष्णा भास्कर कुलकर्णीस कापल्यानंतर छत्रपती शिवाजी महाराज जानेवारी १६६० मध्ये आदिलशाहाच्या ताब्यातील मिरजेला वेढा देण्यासाठी आले.आदिलशाहाने कुर्नलचा सिद्धी जौहर याला सलामतखान हा किताब देऊन छत्रपती शिवाजी महाराजांच्या विरोधात लढण्यासाठी पाठविले.मिरजेला छत्रपती शिवाजी म हाराजांनी वेढा दिल्यानंतर आजच्या सांगली जिल्ह्यातील तासगांव तालुक्यातील धुळगांव या छोट्याशा गावांत छत्रपती शिवाजी महाराज आल्याची व येथील रहिवाश्यांना शिवाजी महाराजांनी जमिनी दिल्याची ऐतिहासिक नोंद आजही धुळगांवातील लोकांच्या घरी ताम्रपटाच्या स्वरुपात सापडते.आजही तेथील लोकांकडे छत्रपती शिवरायांनी दिलेले ताम्रपट उपलब्ध आहेत.

सिद्धी जौहरचा पन्हाळगडाला वेढा :छत्रपती शिवाजी महाराज,पन्हाळगडावर राहून सिद्धी जौहरला तेथेच रोखून ठेवणार होते.जोवर शिवराय पन्हाळगडावर आहेत तोवर जौहर तेथेच थांबणार हे निश्चित होते आणि पुढील रणनीती छत्रपती शिवाजी महाराज आखणार होते.कधीकधी डावपेच यशस्वी करण्यासाठी वेगवेगळ्या पद्धतीची आखणी करावी लागते.अत्यंत मुत्सद्दीपणाने आखलेले डावपेच देखील एखाद्यावेळी यशस्वी होत नाहीत.त्याप्रमाणे पन्हाळगडाच्या वेढ्यात छत्रपती शिवाजी महाराज अडकले आणि पन्हाळगडचा वेढा जौहरने घट्ट आवळला.

वेढ्यातून सुटण्यासाठी रणनिती :सिद्धी जौहर मुत्सद्दी सेनानी होता,मुत्सद्दी राजकारणी नव्हता,विचार न करता सरळ रेषेत धडक देणाऱ्या रेड्यासारखे त्याचे वागणे होते.म्हणून तो छत्रपती शिवाजी महाराजांना ओळखू शकला नाही. जौहरला छत्रपती शिवरायांची रणनीती ओळखणे जमले नाही.या पन्हाळगडाच्या वेढ्याचा चार महिन्याचा काळ ओलांडला होता.नेमके याच वेळेत छत्रपती शिवाजी महाराजांनी जौहरला पत्र पाठविल्यामुळे जौहर सुखावला होता.छत्रपती शिवाजी महाराजांकडून जौहरला निरोप गेला.उद्या आम्ही भेट घेण्यासाठी तळावर येऊ.छत्रपती शिवाजी महाराजांकडून हा निरोप गेल्याने जौहरचा वेढा ढिला पडला.सैनिक बेहोश झाले.अवघ्या एका रात्रीचा प्रश्न होता.

गुप्तहेर खात्यातील शूरविर शिवाजी काशिद :गडाबाहेर कसे पडायचे ? ....या योजनेची तयारी चालू झाली होती.छत्रपती शिवाजी महाराज या विचारात असतानाच गुप्तहेर खात्यातील शूरवीर शिवाजी काशिद छत्रपती शिवाजी महाराजांकडे आले.शिवाजी काशिद हे पन्हाळगडाच्या पायथ्याशी असलेल्या नेबापूर गावचे होते.ते दिसायला *छूत्रपती शिवाजी महाराजांसारखेच होते.

पन्हाळगडावर बाहेरचा माणूस आत जाऊ शकत नव्हता व आतील माणूस बाहेर जाऊ शकत नव्हता.जौहरने छत्रपती शिवाजी महाराजांना वेढ्यामध्ये अडकून ठेवल्याने स्वत: जौहरला देखील येथून हालता येत नव्हते.छत्रपती शिवाजी महाराजांनी याठिकाणची अडचण लक्षात घऊन नेताजी पालकरांनी विजापूरला मुबलक सैन्यासह धडका देण्यास सुरुवार केली खरी पण त्यांना त्यात यश मिळाले नाही.

विशाळगडासही वेढा : सिद्धी जौहरने विशाळगडासही वेढा दिला.वेढा अत्यंत कडक होता.नेमक्या त्याच वेळी नेताजी पालकर विजापूरला धडक देऊन जिजाऊंच्या मार्गदर्शनासाठी राजगडावर आले होते.नेताजी पालकर समोर आलेले पाहून आई जिजाऊंना संताप आला व त्या म्हणाल्या तुमचा राजा तिकडे कैद होऊन पडला आहे आणि तुम्ही दुरवर जाऊन बसलात ? राजांची सुटका कोण करणार ? तेंव्हा राजमाता जिजामातांनी छत्रपती शिवाजी महाराजांची सुटका करण्यासाठी हाती तलवार घेतली व राजगडावरून पन्हाळगडाकडे निघाल्या.हे पाहत असलेल्या नेताजी पालकरांनी जिजाऊंना विनंती केली व जिजाऊंकडील तलवार हातात घेत म्हटले जौहरला हिसका दाखवितो आणि राजांना सोडवून आणतो आणि आई जिजाऊंचा आशिर्वाद घेऊन नेताजी पन्हाळगडाच्या मोहिमेकडे निघाले.विजापूरहून आलेले नेताजी पालकर क्षणाची देखील विश्रांती न घेता तातडीने पन्हाळगडाकडे निघ.




पन्हाळगडावर गुप्त बैठक : छत्रपती शिवाजी महाराजांची व गुप्तहेरांची बैठक झाली.यात छत्रपती शिवाजी महाराजांनी रणनीती आखली.पन्हाळगडावरून २४ मैल दूर असलेल्या विशाळगडाच्या दिशेने या योजनेची तयारी छत्रपती शिवाजी महाराजांनी सुरू केली होती.जाण्याचा मार्ग निवडला होता,केंव्हा निघायचं ? कसे निघायचं ? सोबत कोण कोण असणार ? शत्रूने अडविले तर कसा प्रतिकार करायचा ? शत्रूच्या गोटात कसा गोंधळ निर्माण करायचा ? सगळा तपशील या अगोदरच ठरला होता.या अनुषंगाने शिवाजी काशिद छत्रपती शिवाजी महाराजांना म्हणाले,राजे तुम्ही सिद्धी जौहरला तहासाठी निरोप द्या.जौहरच्या भेटीला मी जातो.तुम्ही गडाबाहेर पडा,यावर छत्रपती शिवाजी महाराज म्हणाले तुम्हाला दगा फ़टका झाला तर ? त्यावर शिवाजी काशिद म्हणाले होणार नाही आणि झालाच तर माझ्यासारखे अनेक शिवाजी काशिद निर्माण होतील पण तुमच्यासारखे शिवराय स्वराज्याला नितांत आवश्यक आहेत.शिवाजी काशिदांच्या या प्रामाणिक व निष्ठापूर्वक आवेशाच्या बोलण्याने छत्रपती शिवाजी महाराजांना गहिवरून आले.

प्रतिरुपाचे प्रात्यक्षिक : शिवाजी काशिद यांना कोण ओळखेल काय ? याची खात्री करण्यासाठी छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वत:चा पेहराव देऊन दुपारी गडावरील अधिकारी कर्मचारी यांचे सत्कार *शिवाजी काशिद यांच्या हाती पार पाडले.गुप्तहेर खात्यातील शिवाजी काशिद यांना कोणीही ओळखले नाही.जिथे आपले कर्मचारी ओळखू शकले नाहीत तिथे शत्रू तर अजिबातच ओळखू नाही शकणार अशी खात्री पटल्यानंतर छत्रपती शिवाजी महाराजांनी तहाच्या वाटाघाटीसाठी येत आहोत असा निरोप सिद्धी जौहरला पाठविला.

छत्रपती शिवाजी महाराजांनी दोन पालख्या तयार ठेवण्यास संगितल्या. गुप्तहेर खात्यातील शिवाजी काशिद आणि छत्रपती शिवाजी महाराज यांचा समान पेहराव,समान सैनिक रात्री १० वाजता किल्ल्यातून दोन पालख्या खाली उतरू लागल्या.शिवाजी महाराजांनी पन्हाळगड सोडला.वेढ्याच्या एका बाजूतून ते वेढ्याबाहेर पडले.सोबत वाट दाखविणारे वाटाडे होते.त्यांनी विशाळगडाचा रस्ता धरला,मार्गात राजांची माणसे अगोदर ठरल्यानुसार त्यांना येवून मिळत होती. वेढ्यापासून छत्रपती शिवाजी महाराज ४ ते ५ मैल दूर पोहचले.विशाळगडावर पोहचण्यासाठी १९ ते २० मैल अंतर अद्याप बाकी होते.याठिकाणी छत्रपती शिवाजी महाराजांसोबत १००० मावळे होते.त्यातच शिवाजी काशिद होते.यावेळी त्यांच्या अंगावर छत्रपती शिवाजी महाराजांसारखा पेहराव होता. जणू प्रति शिवराय राजेच.

सिद्धी जौहरला चकवा दिला : शिवाजी काशिद यांना पालखीत बसविण्यात आले.पालखीसोबत १० ते १२ हत्यारबंद मावळे होते.राजांचा निरोप घेऊन शिवाजी काशिद यांची पालखी लगबगीने मलकापूरच्या दिशेने गेली व छत्रपती शिवाजी महाराजांची पालखी विशाळगडाच्या दिशेने रस्त्याने निघाली.ते पन्हाळगडापासून आणखी दूर जात असताना जौहरच्या गस्ताच्या सैनिकांनी त्यांना पाहिले.आरडाओरडा करीत ते तंबूच्या दिशेने धावले.काही वेळातच सगळा तळ जागा झाला.जौहर रागाने लालेलाल झाला होता.छत्रपती शिवाजी महाराजांनी आपल्याला मुर्ख बनविल्याची भावना त्याला क्षणाक्षणाला झाली.

प्रतिरुपाला शत्रुने ओळखले : सिद्धी जौहरने घोडदळाच्या तुकड्या छत्रपती शिवरायांना शोधण्यासाठी पाठविल्या.एक तुकडी मलकापूरच्या दिशेने गेली होती.या तुकडीला मलकापूरच्या रस्त्यात शिवरायांची पालखी दिसली.या पालखीत बसलेले छत्रपती शिवाजी महाराज (प्रति शिवाजी-गुप्तहेर शिवाजी काशिद)दिसले.या जौहरच्या हत्यारबंद सैनिकांच्या तुकडीने छत्रपती शिवाजी महाराजांच्या वेशातील गुप्तहेर शिवाजी काशिद यांना पकडले.त्यांची पालखी सिद्धी जौहरच्या तंबूकडे नेली.छत्रपती शिवाजी महाराज आल्याची बातमी जौहरला समजताच तो राजांच्या स्वागताला आला. त्याने छत्रपतींच्या पेहराव्यातील गुप्तहेर शिवाजी काशिद यांची भेट घेतली.छत्रपती शिवाजी महाराज तहासाठी गडाखाली तंबूत आलेले आहेत ही बातमी वाऱ्यासारखी पसरली व गडाभोवती डोळ्यात तेल घालून पहारा देणाऱ्या सैनिकांना समजताच त्यांना आनंद झाला.पालखीत बसलेल्या शिवाजी महाराजांना (गुप्तहेर शिवाजी काशिद) जौहरच्या समोर नेण्यात आले.इकडे सिद्धी जौहरच्या तंबूत छत्रपती शिवाजी महाराजांना ओळखणारा अफ़जलखानाचा म ुलगा फ़ाजलखान होता.कृष्णा भास्कर कुलकर्णी ने छत्रपती शिवाजी महाराजांच्या कपाळावर तलवारीचा वार केला होता हे फ़ाजलखानास माहीती होते.म्हणुन फ़ाजलखान गुप्तहेर शिवाजी काशिद यांना म्हणाला...क्या आप सचमुच शिवाजी महाराज है ? अगर आपको जान प्यारी है तो सच बताओ ! यावर शिवाजी काशिद म्हणाले, 'हा मै शिवाजी महाराज हू !' आणि फ़ाजलखानाने शिवरायांचा जिरेटोप मागे सारला आणि पाहतो तर काय कपाळावर कृष्णा भास्कर कुलकर्णी ने दिलेल्या तलवारीचा वर्मी बसलेल्या घावाचा व्रण काही दिसला नाही.त्याने तात्काळ ही बाब सिद्धी जौहरच्या नजरेत आणून दिली. शिवाजी काशिद यांची स्वराज्यनिष्ठा :

फाजलखान म्हणाला...अगर आपको जान चाहिए तो सच बताओ,तरी देखील शिवाजी काशिद म्हणाले, हॉ मै ही शिवाजी महाराज हूं!पण वर्मीच्या घावाचा व्रण दिसला पाहिजे अशी अफ़जलखानाच्या मुलाची तथा फाजलखानाची पक्की खात्री होती.तो वर्मी घाव त्यांना दिसला नाही.कारण ते छूत्रपती शिवाजी महाराज नव्हते.तर *प्रति शिवराय नरवीर शिवाजी काशिद होते.यामुळे सिद्धी जौहरला कळून चुकले की आपणास छत्रपती शिवाजी महाराजांनी चकवा दिला आहे.यावर शिवाजी महाराज म्हणजेच शिवाजी काशिद यांच्या जवळ संशयाच्या नजरेने न्याहाळत विचारले, तू छत्रपती शिवाजी महाराज नाहिस तर कोण आहेस ? यावर शिवाजी काशिद हसत म्हणाले,मी छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्याचा एक चाकर आहे,यावर सिद्धी म्हणाला हं.. कसलं स्वराज्य ? कसाला शिवाजी राजा ? जौहर संतापलेला होता.तो म्हणाला,मला दगाबाजी करून तुझा शिवाजी राजा माझ्या हातातून निसटला आहे.पण जाणार कुठे ? गाठ जौहरशी आहे ! पाताळातून शोधून काढीन'.शिवाजी काशिद जौहरकडे पाहून हसू लागले आणि म्हणाले,'आमचे राजे धनुष्यातून सुटलेल्या बाणाप्रमाणे तुमच्या वेढ्यातून निसटले आहेत.आता हाती लागणे शक्य नाही.छातीचा कोट करून आमच्या राजाला जपणारे कितीतरी त्यांच्या सोबत आहेत.जीव देतील स्वत:च्या राजासाठी पण राजाला तुमच्यापासून राखून ठेवतील हाती लागू देनार नाहीत.

सिद्धी जौहर मोठमोठ्याने हसू लागला आणि शिवाजी काशिद यांच्याकडे पाहत म्हणाला, तुझा राजा नक्की सापडेल आणी सापडल्यावर मी त्याला काय शिक्षा देईन ठाऊक आहे काय ? जौहरने स्वत:चा हात गळ्याभोवती फ़िरवला आणि बोलला, समजलं ? शिरच्छेद करील त्याचा,आणि तू,त्याच्यानंतर तुझं देखील मुंडकं उडवीन मी ! म्हणजे आता जे बोलत होतास त्याबद्दल तुला पश्चाताप वाटेल.यावर शिवाजी काशिद यांना जौहरचे बोलणे आवडले नाही.त्यांचे डोळे रागाने लालेलाल झाले आणि जौहरच्या नजरेला नजर भिडवित शिवाजी काशिद ओरडले,खामोश! माझ्या राजाबद्दल एक शब्द जरी वावगा बोललास तर याद राख! वटवागूळ देखील रात्रीच घुत्कारतं, म्हणून ते कोणी कान देऊन ऐकत नाही,तुझं बोलणं तसलंच आहे,ते कशापायी ऐकायचं ?

माझा शिवाजी राजा,त्यांची सर तुझ्यासारख्याला यायची नाही.तुला शिवरायांचं मोठंपण काय समजणार ? आमचा राजा लाखमोलाचा,पोशिंदा आहे. लाख मरोत पण माझा राजा जगो,असंच मी म्हणणार !

हे सारं ऐकून सिद्धी जौहर गांगरला.थोड्याच वेळात स्वत:स सावरून म्हणाला,वैसाही होगा......मरने को हो तैयार..तेरे राजा के वास्ते तू मरेगा ! अब यहाँ इसी वक्त ! शिवाजी काशिद हसत म्हणाले,मरणाचे भय मला घालतोस ? मरणाचे भय तुझ्यासारख्यांना वाटावं,आम्हाला नाही.छत्रपती शिवाजी म हाराजांच्या मराठा स्वराज्याचा भगवा हाती घतला,त्याच वेळी या मर्द मराठा मावळ्याने छातीवर मरण गोंदवून घेतलं.स्वराज्यासाठी मरण कुठेही येवो,कसंही येवो,मरणाला भिऊन पळणारा हा शिवाजी काशिद नाही.मेला तरी स्वराज्यासाठी मरण..! स्वराज्यासाठी जगणं आणि स्वराज्यासाठी मरणं...स्वराज्याचा चंग बांधला आहे आम्ही.तेंव्हा मरणाचं भय या गड्याला घालू नकोस समजलं. जौहर पिसाळला शिवाजी काशिद यांचे बोलने त्याच्या जिव्हारी झोंबलं,छत्रपती शिवाजी महाराज हातून निसटल्याने तो बिथरला होता,शिवाजी काशिद हे देखील वस्तादों के वस्ताद होते.त्यांना ना मरणाचे भय,ना खेद,ना खंत यांचे बोलणे आणि विचार म्हणजे फक्त छत्रपती शिवाजी महाराज रयतेच्या स्वराज्याचे.

शिवाजी काशिद यांची स्वराज्यनिष्ठा पाहून सिद्धी जौहरने शिवाजी काशिद यांना ठार मारण्याचा आदेश दिला.तरी देखील शिवाजी काशिद हे ठाम होते. जौहरच्या सैनिकांनी शिवाजी काशिद यांच्या छातीत दोन भाले खुपसले.शिवाजी काशिद खाली कोसळले,शिवाजी काशिद यांच्या छातीतून भाले खुपसल्याने रक्त उडाले.खाली पडत असताना प्राण सोडण्यापुर्वी शिवाजी काशिद म्हणाले.'अरे वेड्यांनो...सोंग घेणाऱ्या शिवाजीची पाठ पाहता आली नाही.खऱ्या शिवाजी राजांचा विचारच सोडून द्या,गुप्तहेर खात्यातील शिवाजी काशिद यांनी प्राण सोडला.त्यांना शिवाजी राजांचे रुप घेत असतानाच माहीत होते की,आपल्याला जर दगाफटका झाला तर आपल्याला जीव गमवावा लागेल,याची पुरेपूर खात्री असताना देखील आपल्या छत्रपती शिवाजी महाराजांसाठी,रयतेच्या स्वराज्यासाठी स्वत:चा जीव धोक्यात घालून छत्रपती शिवाजी महाराजांचे प्रतिरूप घऊन आपले प्राण दिनांक - १३ जुलै १६६० रोजी गमावले.

छत्रपती शिवाजी महाराज वेढ्यातून निसटले :छत्रपती शिवाजी महाराज निसटल्याचे समजल्याबरोबर जौहरने दिलेर मसूद याला राजांच्या पाठलागावर पाठविले.तोपर्यंत काही अवधी निघून गेला होता.छत्रपती शिवाजी महाराजांनी योजलेली रणनीती पाहून सिद्धी जौहर आणि त्याचे सैन्य कमालीचे संतापले होते.त्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांना पकडण्यासाठी मोठ्या त्वेषाने पाठलाग सुरु केला.विशाळगडापर्यंतचे अंतर खूप असल्याने मावळ्यांना प्रयत्नांची पराकाष्टा करावी लागत होती.परंतू जिद्द कायम होती.विशाळगडापासून आठ मैल अंतरावर असणाऱ्या गजापूर जवळील घोडखिंडीत छत्रपती शिवाजी महाराज जेंव्हा आले,त्यावेळी त्या खिंडीतच शत्रुशी लढ्यासाठीची तयारी शिवरायांनी दाखवली.मात्र बाजीप्रभूंनी शिवाजी राजांना पुढे निघून जाण्यास सांगितले.आपण काही सैन्य घेऊन ही खिंड लढवतो.शरीरात प्राण असेपर्यंत एकाही गनिमास पुढे जाऊ देणार नाही.असे सांगितले.छत्रपती शिवाजी महाराजांना बाजीप्रभूंच्या हट्टापायी विशाळगडावर जावे लागले.तथापि शिवरायांनी विशाळगडावर गेल्यागेल्या ५ तोफा उडविल्या जातील.अशी ग्वाही देऊन त्यानंतर ही लढाई थांबवून ताबडतोब विशाळगडाकडे बाजीप्रभूंना सर्व सैन्य घऊन कुच करण्यास सांगितले. बाजीप्रभूंनी स्वराज्यासाठी प्राण त्यागले.बाजीप्रभूंना निवडक सैन्य घऊन घोडाखिंडीत मसुदला रोखण्यासाठी थांबविले.बाजीप्रभूंच्या शरीरावर असंख्य घाव होऊन देखील त्यांची तलवार शत्रूंची शिरे उडवित होती.बाजीप्रभू मसुदशी लढता लढता धारातिर्थी पडले.मात्र शिवाजी महाराज विशाळगडावर गेल्याच्या ५ तोफा ऐकल्याबरोबर बाजीप्रभूंनी प्राण दिनांक १३ जुलै १६६० रोजीच सोडला. छत्रपती शिवाजी महाराजांचे प्रतिरूप घणारे शिवाजी काशिद व घोडखिंड पावनखिंड बनविणारे बाजीप्रभू या शूरविरांचे पुर्णाकृती पुतळे कोल्हापूरातील पन्हाळगडावर बसविण्यात आले आहेत.छत्रपती शिवाजी महाराजांनी निर्माण केलेल्या रयतेच्या स्वराज्यासाठी प्राणाची आहुती देणारे विर बाजीप्रभू आणि विर शिवाजी काशिद हे स्वराज्यनिष्ठ मावळे होते.शाहिस्तेखानावर हल्ला करण्यासाठी छत्रपती शिवाजी महाराजांनी तह करून पन्हाळा २२ सप्टेंबर १६६० रोजी सिद्धी जौहरला दिला.यानंतर सुमारे १३ वर्षानंतर पन्हाळगड पुन्हा ६ मार्च १६७३ रोजी कोंडाजी फ़र्जंद यांनी अवघ्या ६० मावळ्यांच्या शर्तीच्या प्रयत्नाने स्वराज्यात जिंकून घतला.छत्रपती शिवाजी महाराजांनी या गडाचा कारभार महाप्रतापी स्वातंत्र्यवीर छत्रपती संभाजी महाराजांवर सोपविला होता.

छत्रपती शिवाजी महाराजांचे नेबापुरला आगमन : छत्रपती शिवाजी म हाराज रयतेच्या स्वराज्यासाठी प्राणत्याग करणाऱ्या प्रति शिवाजी गुप्तहेर शिवाजी काशिद यांच्या घरी गेले.शिवाजी काशिद यांच्या पत्नी पारूबाई यांचे छत्रपती शिवाजी महाराजांनी सांत्वन केले.शिवाजी काशिद यांचा मुलगा यशवंत यांना अधिकारी पदी नेमले.गुप्तहेर शिवाजी काशिद यांचे नेबापूरला स्मारक उभारले. सर्व कुटुंबाची व्यवस्था करून छत्रपती शिवाजी महाराज राजगडावर गेले. प्रति शिवराय गुप्तहेर नरवीर शिवाजी काशिद या स्वराज्यनिष्ठ मावळ्याला त्यांच्या पुण्यतिथी दिनानिमित्त विनम्र अभिवादन आणि मानाचा मुजरा.

**-प्रा.खंडागळे सोमीनाथ**

पान १ वरून पुढे...

## दारूच्या नशेत...

आत्महत्येचा प्रयत्नही केला होता. आज सकाळी दोघेही नशेत असताना पुन्हा वाद झाला आणि या वादात बापाने लाकडी बांबूने मुलाच्या डोक्यात मारले. त्यामुळे रोहीतचा जागीच मृत्यू झाला. घटनेची माहिती मिळताच माजलगाव पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक राहुल सुर्यतळ, पोउपनि आकाश माकणे व पथकाने घटनास्थळी धाव घेतली. पंचनामा करून मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी माजलगाव ग्रामीण रुग्णालयात पाठवण्यात आला. दरम्यान, पोलिसांनी आरोपी बापाला ताब्यात घेतले आहे.

## बारावीचा निकाल...

**● निकाल कसा पाहायचा ?**

- सर्वप्रथम महाराष्ट्र बोर्डाच्या अधिकृत वेबसाइट ारहीर्शीीश्रीं.पळल. ळप वर जा. - होमपेजवरील क्ढड च्या लिंकवर क्लिक करा. - तुमचा परिक्षा क्रमांक आणि इतर आवश्यक तपशील टाका आणि सबमिट बटणावर क्लिक करा. - तुमचा निकाल स्क्रीनवर दिसेल. सेव्ह करा आणि प्रिंट करा. दरम्यान, २०२५ मध्ये महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या (MSBSHSE) बारावी (HSC) परीक्षेसाठी एकूण १५,१३,९०९ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. ही परीक्षा राज्यभरातील ३,३७३ परीक्षा केंद्रांवर ११ फेब्रुवारी ते ११ मार्च २०२५ या कालावधीत आयोजित करण्यात आली होती.

**● दहावीच्या निकालाची प्रतिक्षा**

दहावीच्या परीक्षेचा निकाल लवकरच जाहीर होणार असल्याची शक्यता वर्तवली जात आहे. हा निकाल मे महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यात, म्हणजेच १५ मेच्या आधी घोषित केला जाऊ शकतो, अशी माहिती समोर येत आहे. मार्चमध्ये परीक्षा संपल्यानंतर आता सर्वच विद्यार्थ्यांचे लक्ष निकालाच्या तारखेवर लागले आहे. मात्र, अद्याप महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाकडून अधिकृत तारीख जाहीर करण्यात आलेली नाही.

## पहलगामच्या दहशतवाद्यांना...

घेतलं होतं. पहलगामच्या दहशतवाद्यांना रसद पुरवल्याचा त्याच्यावर आरोप होता. पोलीस त्याला ज्या ठिकाणी हल्ला झाला, त्या ठिकाणाहून त्याला दहशतवाद्यांच्या तळावर नेले जात होते. मात्र पोलिसांच्या हातातून सुटून त्याने विश्वा नदीत उडी घेतली आहे. त्याचा यात मृत्यू झाला आहे. मृत्यू झालेला हा आरोप २३ वर्षांचा होता.

नेमका कसा पळाला ? मिळालेल्या माहितीनुसार इम्तियाज याने दहशतवाद्यांना अन्न आणि रसद पुरवल्याचं कबुल केलं होतं. दहशतवादी ज्या ठिकाणी लपलेले आहेत, ते ठिकाण मी तुम्हाला दाखवतो, असं त्याने पोलिसांना सांगितलं होतं. त्यानंतर पोलीस त्याला घेऊन गेले होते. मात्र मध्येच त्याने विश्वा नदीत उडी घेतली.

अनेक प्रश्न उपस्थित- या सर्व घटनेचा व्हिडीओ समोर आला आहे. पहलगाम दहशतवादी हल्ल्याचा तपास करण्यासाठी मृत आरोपी हा म हत्त्वाचा दुवा होता. मात्र त्याने नदीत उडी घेत स्वत:ला संपवलं. त्यामुळेच आता अनेक प्रश्न उपस्थित केले जात आहेत.

मेहबुबा मुफ्ती यांचे गंभीर आरोप- दरम्यान, हे प्रकरण समोर आल्यानंतर जम्मू काश्मीरमधील नेत्या मेहबुबा मुफ्ती यांनी गंभीर स्वरुपाचे आरोप केले आहेत. पहलगामच्या हल्ल्यातून जम्मू-काश्मीरचे पर्यटन कमी करण्याचा, सांप्रदायिक सद्भावनेवर घाला घालण्याचा, काश्मीरमधील शांती भंग करण्याचा एक नियोजित कट असल्याचे वाटत आहे. हिंसेची एखादी घटना संपूर्ण व्यवस्था उद्ध्वस्त करू शकते. मनमानी पद्धतीने लोकांना अटक केलं जातंय, घरांना नेस्तनाबूत करून टाकलं जातंय, निर्दोष नागरिकांना लक्ष्य केलं जात आहे. पहलगाच्या रुपात गुन्हेगारांनी त्यांचा हेतू साध्य करून घेतला आहे. कुलगाममधील हे प्रकरण फारच गंभीर आहे, अशी प्रतिक्रिया मुफ्ती यांनी दिलीय. तसेच या प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करणे गरजेचे असल्याचीही मागणी त्यांनी केली.

## सरपंच व ग्रामसेवक...

यांना अनेक वेळा निवेदन देऊनही चौकशी करण्यात आली नाही त्यामुळे सोमवार दिनांक पाच मे रोजी वांगी येथील सेवा सहकारी सोसायटीचे हरिभाऊ शेळके हे बेमुदत उपोषणाला बसणार आहेत.

पान ४ वरून पुढे...

## कपिलधारवाडी येथे...

मंगळवार दि.६ मे २०२५ रोजी वैशाख शुद्ध ।। ९ ।। पासून भव्यदिव्य पाच दिवसीय कीर्तन महोत्सवास प्रारंभ होत आहे. या कीर्तन महोत्सवामध्ये मंगळवार दि. ६/५/२०२५ रोजी ह.भ.प.नाना महाराज कदम बंकट स्वामी मठ संस्थान मेकनूर, बुधवार दि.७/५/२०२५ ह.भ.प अक्षय महाराज पिंगळे विनोदाचार्य (बीडकर), गुरुवार दि. ८/ ५ /२०२५ ह.भ.प.कल्याण महाराज काळे शिवचरित्रकार (अहिल्यानगर), व शुक्रवार दि. ९/५ /२०२५ ह.भ.प. शंकर म हाराज चिंचकर भागवताचार्य (बिडकुचीवाडी) याचे हरीकिर्तन सेवा होणार आहेत. शनिवार दि.१०/५/२०२५ रोजी सकाळी १० ते १२ या वेळेमध्ये ह.भ.प.गु.महंत लक्ष्मण महाराज मेंगडे मठाधिपती बंकट स्वामी संस्थान मठ नेकनूर पंढरपूर आळंदी दे. यांचे काल्याचे सुश्राव्य कीर्तन होणार आहे.या नाम सप्ताहात महंत ह.भ.प.हरिहारनंद भारती महाराज श्रीक्षेत्र तपोवन मोरेश्वर संस्थान कोळवाडी ,विश्वनाथ आप्पा सलगार श्री. क्षेत्र कपिलधार तसेच दत्त उपासक वैजनाथ महाराज शिंदे दत्त संस्थान बालाघाट यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. मृदंगाचार्य: ह.भ.प. योगेश महाराज जोगदंड कोळवाडी, ह.भ.प.सुशील महाराज शिंदे कपिलधारवाडी ,गायनाचार्य: ह.भ.प.शिवाजी महाराज निवडे काम खेडा, शेषराव महाराज चव्हाण कोळवाडी, महादेव महाराज चव्हाण, अर्जुन महाराज तांगडे, सुशील महाराज शिंदे यांची आहे. तबलावादक :ह.भ.प लखन महाराज शिंदे कर्झणी, काकडा नेतृत्व: ह.भ.प हरिदास महाराज खुळे, ह.भ.प. वसंत महाराज शिंदे यांची आहे.काल्याच्या कीर्तनाने सांगता व महाप्रसाद होणार आहे तरी या कीर्तन महोत्सवाचा व श्रवण भक्तीचा पंचक्रोशीतील भाविक भक्तांनी लाभ घ्यावा असे आवाहन समस्त गावकरी मंडळी, वाघेश्वरी मित्र मंडळ कपिलधारवाडी यांनी केले आहे.

## आमखास मैदानावर...

घेण्यात आली होती.०४ ऑक्टोबर २०२४ ला राज्य शासनाच्या वतीने वक्फ बोर्ड,अल्पसंख्याक आयुक्तालय व मौलाना आझाद आर्थिक विकास महामंडळ इमारतींच्या खर्चाच्या अंदाज पत्रकास मंजुरी देण्यात आली.०६-डिसेंबरला सार्वजनिक बांधकाम विभागाने वर्क ऑर्डर काढली.ही बाब काही लपलेली नाही,जबाबदार नेता म्हणून माजी खासदारांनी त्या वेळेस विरोध का केला नाही ?त्यांना उशिरा जाग आली की फक्त राजकारण करण्या साठी असला मुद्दा हाती घेतला ?असा प्रश्न ही समीर काझी यांनी उपस्थित केला.

फुटबॉल स्टेडियमच्या जागेला कोणीच हाथ लावू शकता नाही

आमखास मैदानाची एकूण जागा २९.१० एकर आहे,पैकी ११ एकर जमी ही फुटबॉल स्टेडियम साठी आरक्षित आहे.त्या ठिकाणी भव्यदिव्य स्टेडियम व्हावे ही आमचीही ही इच्छा आहे.केंद्र व राज्य सरकारच्या मदतीने हे स्टेडियम उभारले जाणार आहे.या बाबत जलील यांना कल्पना आहे.जागा स्टेडियम साठीच राखीव आहे,ते तीन वर्षे वक्फ सदस्य होते,त्यांना खडा न खडा माहिती आहे.म्हणून फुटबॉल स्टेडियमच्या जागेला आम्ही हाथ लावला,असा प्रश्नच उद्भवत नाही.१२-०८-२०२४ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयात पालकमंत्र्यांचाय आधायक्षतेखाली जिल्हा नियोजन समितीची बैठक झाली.बैठकीत आमखास मैदानावर आंतरराष्ट्रीय दर्जाचे स्टेडियम व्हावे,या प्रस्तावाच्या निर्णयास मान्यता देण्यात आली.१४-०८-२०२४ ला राज्य वक्फ मंडळाने स्टेडियम च्या जागेसाठी तत्वत मान्यता दिली.सदरील नियोजित स्टेडियमच्या बांधकामासाठी वक्फ मंडळाचे मुख्यकार्यकारी अधिकारी जुनेद सय्यद यांनी १०९ कोटीच्या मंजुरीचा प्रस्ताव २७-०८-२०२४ रोजी प्रधान सचिव, नगरविकास विभाग, मंत्रालय यांच्या कडे पाठविण्यात आला. विशेष म्हणजे सदर स्टेडियम हे वक्फ मंडळाच्या देखरेखीत होणार आहे.

## लोकपत्रकार बाप्पासाहेब...

शासकीय सेवा , प्रिन्ट मिडीया , इलेक्ट्रॉनीक मिडीयातील पत्रकार बांधवासाठीही विविध क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या महिला / पुरुष मान्यवरांचा या व्यासपिठावर त्यांना पुरस्कार देवून त्यांच्या सन्मान केला जातो. दि . २५ मे २०२५ रोजी संपन्न होणाऱ्या या पुरस्कार सोहळ्यासाठी मराठवाड्यातील या मान्यवरांची विविध पुरस्कारासाठी लेक माहेरचा कट्टा च्या संस्थापिका सौ .सारिका प्रमोद ढाने यांनी निवड केली आहे या मध्ये धाराशिव जिल्ह्यामधुन सा . दै . देशभक्तचे संपादक लक्ष्मण ( तात्या ) शिंदे - पाटील , जयमहाराष्ट्र चॅनलचे रिपोर्टर उदय साबळे , टिव्ही ९ मराठी चॅनलचे श्रीराम क्षिरसागर , बीड जिल्हा भारतीय जनता पार्टीचे युवा नेते आणि महाराष्ट्र राज्याच्या पर्यावरण मंत्री पंकजाताई मुंडे यांचे विश्वासु एकनिष्ट कार्यकर्ते विशाल ज्ञानोबा पांचाळ , केज ,सरपंच गोरख भागूजी भांगे , डोका ,वसंत सोनवणे संपादक जनहित मराठी सेवा न्युज, विडा , तात्या लहु गवळी आदर्श क्रांती मराठी न्युज, नेकनुर , भागवत मुंडे युवा उद्योजक तथा सामाजिक कार्यकर्ते अंबेजोगाई , टिव्ही टेन वार्ता संपादक परळी, बप्पासाहेब ज्ञानदेव भांगे यांची पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे.

## श्री चिंतेश्वर...

उपस्थिती होती. विद्यार्थ्यांचा अभ्यासक्रमासोबत सर्वांगीण विकास व्हावा या उद्देशाने श्री चिंतेश्वर विद्यालय गेवराई येथे दिनांक २ मे ६ मे या कालावधीमध्ये मुक्तछंद उन्हाळी शिबिराचे आयोजन करण्यात आले असून या शिबिरामध्ये सूर्यनमस्कार, योगा,ध्यान,स्व-संरक्षण, मेहंदी,रांगोळी, आर्ट अँड क्रॉफ्ट नृत्य,पपेट शो,दिर्घकथा,श्रीमद् भगवत गीता १५ वा अध्याय पाठांतर,झुंबा डान्स इ.विविध कौशल्यपूर्ण घटकांचा समावेश करण्यात आलेला आहे. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगती बरोबरच त्यांची सर्वांगीण प्रगती व्हावी या उद्देशाने सदरील शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.मुक्तछंद शिबिराच्या आजच्या प्रथम दिनी शिबिरास भा.शि.प्र.संस्था कार्यवाह डॉ.श्री.हेमंत वैद्य,अर्थ समिती अध्यक्ष श्री नितीन डोळे,सुदर्शन गुळजकर यांनी भेट देऊन शुभेच्छा दिल्या.

## शैक्षणिक व्हिडिओ...

सचिन वाल्मिक वाघमारे यांच्या सुविद्य पत्नी आहेत. श्रीमती प्राजक्ता भगवान मोरे यांच्या दुहेरी यशाबद्दल त्यांचे हितचिंतक, आप्त स्वकीय यांनी अभिनंदन केले असून याचे व्यापक स्तरावर सर्वत्र स्वागत केले जात आहे.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com
हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक - दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

# पॅलेस्टाईन आणि गाझा पट्टीतील लोकांना मदतीच्या नावाखाली केला निधी जमा, एटीएसला लागली कुणकुण

**गेवराई । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यातील गेवराई येथे पॅलेस्टाईन व गाझा पट्टीतील नागरिकांसाठी मदतीच्या नावाखाली, हिमायत फाऊंडेशनच्या माध्यमातून सोशल मीडियावरून निधी जमा करण्यात येत होता. मात्र, जमा झालेला निधी स्वतःच्या फायद्यासाठी वापरल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणाची गंभीर दखल घेत दहशतवाद विरोधी पथकाने तात्काळ कारवाई करत स्वतः पुढाकार घेऊन गेवराई येथील कुरेशी शाहरुख उर्फ छोटू मिया याच्या विरोधात गुन्हा नोंदवला आहे.




शाहरुख उर्फ छोटूमिया कुरेशी (रा. राजगली, गेवराई, जि. बीड) याने हिमायत फाऊंडेशन या एनजीओला परदेशातील उद्दिष्टांसाठी काम करण्याचा अधिकृत परवाना नसतानाही, सोशल मीडियावरून गेवराई शहरातील नागरिकांचा विश्वास संपादन करत गाझामधील नागरिकांना मदत करण्याचे आवाहन केले. मात्र, फाऊंडेशनच्या अधिकृत बँक खात्यावर देणगी न घेता, कुरेशीने स्वतःच्या वैयक्तिक बँक खात्यांचा QR कोड वापरून निधी जमा केला आणि लाखोंचा निधी स्वतःच्या फायद्यासाठी वापरल्याचे समोर आले आहे. परिणामी, अनेक नागरिकांची फसवणूक झाल्याचे उघडकीस आले आहे.

मदतीच्या नावाखाली केला निधी जमा

सध्या देशभरात पाकिस्तानी आणि बांगलादेशी नागरिकांच्या शोध मोहीमा सुरू असतानाच हिमायत फाऊंडेशन या एनजीओला परदेशात काम करण्याचा अधिकृत परवाना नसतानाही मदतीच्या नावाखाली निधी जमा करण्याचा प्रयत्न केल्याने या प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन तातडीने कारवाई करण्यात आली. सध्या या प्रकरणाचा पुढील तपास पोलिसांकडून करण्यात येत आहे.

दरम्यान, गेल्या काही वर्षांत एनआयए आणि दहशतवाद विरोधी पथकांनी दहशतवादाशी संबंधित अनेक 'मोड्युल्स'चा पर्दाफाश करून त्यांना उद्ध्वस्त केले आहे. सोशल मीडियाच्या माध्यमातून तरुणांची भरती करणाऱ्या दहशतवादी संघटनांचे भयावह वास्तव समोर येत आहे. या संघटना आपल्या विध्वंसक कारवायांसाठी आवश्यक असलेले मनुष्यबळ मिळवण्यासाठी सोशल मीडियाचा प्रभावीपणे वापर करत आहेत. याशिवाय, डार्क वेबचा वापर करून मोठ्या प्रमाणावर दहशतवादी हल्ल्यांचे नियोजन, शस्त्रास्त्रांची खरेदी आणि आर्थिक व्यवहार घडवले जात आहेत. डार्क वेबमुळे निर्माण होणारे आव्हान आज जगभरातील सुरक्षा यंत्रणांसाठी एक मोठी डोकेदुखी ठरत आहे.

# प्रकल्प संचालिका संगीता देवी पाटील म्हणजे मला पहा फुल वाहा; शासनाचा निधी ओम भट स्वाहा:

**माजलगाव । प्रतिनिधी**

**पंतप्रधान घरकुल योजनेअंतर्गत प्रायोगिक तत्त्वावर नियुक्त केलेले इंजिनीयर पदावर असलेले कर्मचारी घरकुल बांधायचे असले तरीही हप्त्यासाठी पैसे मागतात आणि घरकुल बांधायचे नसले तरीही ठराविक एक रकमे रक्कम मागतात यामुळे खरे लाभार्थी अडचणीत येत आहेत आणि खोटारडे आपले पोळी भाजून घेत आहेत याबाबतही संगीता देवी पाटील यांना विचारणा केली असता यांनी पुराव्याची मागणी केली मात्र सोन्याचा चमचा घेऊन जन्माला आलेल्या संगीता देवी पाटील यांना ग्रामीण भागातील योजना अवघड जागेवरच दुखणं का समजत नाही आम्ही तक्रार करावी तर घरकुलाचे हप्ते मिळणार नाहीत आम्ही तक्रार करावी तर बोगस घरकुल मिळणार नाही अशी अडचण असतानाही जर पाटील मॅडम पुरावाच मागणार असतील तर तुमचे भ्रष्ट प्रशासन तुम्हाला लखलाभ**

बीड जिल्हा परिषदेअंतर्गत ग्रामीण विकास योजनेच्या प्रकल्प संचालिका संगीता देवी पाटील म्हणजे मला पहा फुले वाहा आणि आणि शासनाचा निधी ओम भट स्वाहा वाहा या अवस्थेनुसार काम करताना दिसत आहेत. गेल्या महिनाभरापूर्वी संगीता देवी पाटील यांनी ईद आणि गुढीपाडव्यानिमित्त महिला बचत गटाचे मेळावे भरवले यामध्ये गुढीपाडव्यानिमित्त जिल्हा परिषदेच्या ग्राउंड अंतर्गत पालकडे ग्राहक फिरकलाच नाही यामुळे ज्या महिला बचत गटांनी इथे स्टॉल लावले होते त्यांची पूर्णतः संगीता देवी पाटील यांनी फसवणूक केल्याचे दिसून आले चार दिवस उलटून गेले तरीही पाच हजार रुपयांचा व्यवसाय न झाल्याची खंत सदर महिला बचत गटाच्या व्यावसायिकांनी व्यक्त केली आम्ही ज्यावेळी दुपारी वृत्तसंकलणासाठी जिल्हा परिषदेच्या आवारात पोहोचलो त्यावेळी तिथे ग्राहक तर नव्हतेच मात्र जिल्हा परिषदेने निर्माण केलेल्या शो साठीच्या कारंजामध्ये जनावर पाणी पिताना दिसत होते त्यामुळे आम्ही महिला बचत गटाच्या स्टॉलमध्ये संपर्क साधला असता जिल्हा परिषदेने आमची सरळ सरळ फसवणूक केल्याचे बोलून दाखविले जिल्हा परिषदेचा गुढीपाडवा एकदम फ `ल गेल्याची सांगितलं जिल्हा परिषदेने आयोजित केलेली ईद नाही आणि गुढीपाडवा ही नाही लोकांनी मीना बाजार मध्ये जाणे पसंद केले यामुळे संगीता देवी पाटील आपण कुठे कमी पडला आहात याचा आत्मपरीक्षण करा का शासनाचा निधी आला आणि उडून दिला असा प्रत्येक तर तुमचा नाही ना, संगीता देवी पाटील म्हणजे अनेक पत्रकारांची मैत्रीण यांच्या विरोधात महिला म्हणून कोणी आवाज उठवायचा नाही यांनी मात्र जिल्हाभरातील कुरण फस्त केल्याशिवाय राहायचं नाही असा प्रकार बीड जिल्ह्यात चालू असल्यामुळे पत्रकाराचे शिष्टमंडळ पालकमंत्री अजित पवारांची भेट घेऊन पंतप्रधान घरकुल आवास योजना आणि महिला बचत गट प्रोत्साहन निधीबाबत चौकशी करण्यासाठी लवकरच भेट घेणार आहे.

## बीड जिल्ह्याचा पालकमंत्री अजित पवार असून अडचण नसून खो ळंबा

**बीड जिल्ह्याचे पालकमंत्री महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार झाल्याने बीड जिल्ह्याच्या अशा पल्लवीत झाल्या होत्या ज्याप्रमाणे पुणे बारामती चे प्रशासन चालते त्यानुसार बीड जिल्ह्यातील प्रशासन चालवून भ्रष्टाचार मुक्त प्रशासन जिल्ह्याला पाहायला मिळेल अशी अपेक्षा होती मात्र बीड जिल्ह्याच्या पालकमंत्री असलेले राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे पुणे आणि बारामती प्रेम झाकून राहिलेले नाही डोळ्यावर पापणी वडून स्वीकारले बीड जिल्ह्याची पालकमंत्री पद वाऱ्यावर सोडून अजित पवार पुणे आणि बारामती भागातच मग न दिसणारे पालक मंत्री म्हणून आणि महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री म्हणून जो अजित दादांचा अरे बाबा आणि वचक प्रशासनावर पाहायला मिळाला तो मात्र बीड जिल्ह्यात मूग गिळून गप्प बसल्याचा दिसून आला यामुळे बाहेरचा पालकमंत्री म्हणजे असून अडचण आणि नसून खोळांबा याचा प्रत्यय बीड जिल्ह्याला क्षणोक्षणी पाहायला मिळत आहे**






*सद्भावना सत्याग्रह आज भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या वतीने परळी वैजनाथ येथे आयोजित करण्यात आला होता यावेळेस पक्षाचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ बीड जिल्हा काँग्रेसचे माजी जिल्हाध्यक्ष राहुल सोनवणे पक्षाचे पक्ष निरीक्षक अमर खानापुरे तर पक्षाचे सांगलीचे निरीक्षक आदित्य पाटील तसेच काँग्रेसचे जिल्ह्यातील सर्व पदाधिकारी आजच्या सत्याग्रहाला उपस्थित होते.*

# रवींद्र किसनराव नागरगोजे पोलीस उपनिरीक्षक सेवानिवृत

**बीड । प्रतिनिधी**

येथील पोलिस ठाण्यात सलग३८ वर्षे सेवा करणारे रविंद्र नागरगोजे याचा सेवा निवृत्तीनिमित पोलिस अधिक्षक नवनीत कावत साहेब यांनी त्याचा सपत्नीक सत्कार करून शुभेच्छा दिल्या. नागरगोजे यांनी

दिनांक १६/०२ /१९८७ रोजी पोलीस खात्यात जॉईन झाले आणि पोलीस ठाणे नेकनूर, दूरक्षेत्र लिंबागणेश, पाटोदा ,शिरूर, बीड शहर, तलवाडा, वडवणी या ठिकाणी यशस्वीरीत्या पोलीस खात्याची सेवा केली आणि खात्याअंतर्गत परीक्षा देऊन दिनांक २०/१०/२०२० रोजी पोलीस उपनिरीक्षक म्हणून प्रमोशन झाले त्यानंतर कोर्ट पैरवी अधिकारी म्हणून बीड सेशन कोर्टात तसेच महामार्ग पोलीस केंद्र परभणी येथे सेवा केली . पुढे त्याची दिनांक १८.१.२०२३ रोजी महामार्ग पोलीस केंद्र मांजरसुंबा येथे नेमणूक झाली . महामार्ग पोलीस केंद्र मांजरसुंबा येथे यशस्वीरित्या व निष्कलंक सेवा एकुण ३८ वर्ष २ महिने पोलीस खात्यात सेवा करून दिनांक ३० )०४ /२० २५ रोजी नियत वयोमानानुसार बीड पोलीस दलातून सेवानिवृत्त झालो आहे .

पोलीस अधीक्षक कार्यालय बीड येथे माझा सपत्नीक सत्कार मा. पोलीस अधीक्षक साहेब नवनीत कावत साहेब यांचे हस्ते करण्यात आला .यावेळी सत्कार समारंभाला अप्पर पोलीस अधीक्षक मा.सचिन पांडकर मा. गोलडे साहेब तसेच पोलीस निरीक्षक संतोष साबळे साहेब पोलीस निरीक्षक शितल कुमार बल्लाळ साहेब हजर होते.

# आंबेडकरी अनुयायांनी बुद्ध धम्माची चळवळ गतिमान करण्यासाठी पुढाकार घ्यावा:पप्पु कागदे

**बीड । प्रतिनिधी**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी जगातील प्रचलित धर्माचा अभ्यास केला होता. त्या धर्मामध्ये बौद्ध धम्माने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना प्रभावित केले होते. बुद्ध धम्मात जाती-भेद-उच्च-निच अस्पृश्यतेला थारा नव्हता. या धम्मात सर्व मानव समान आहेत. म्हणूनच डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी १९३५ साली धर्मांतराची घोषणा केली होती. मी हिंदू म्हणून जरी जन्माला आलो असलो तरी हिंदू म्हणून मरणार नाही. अशी घोषणा करुन १४ आक्टोबर १९५६ साली नागपुरात बुद्ध धम्माची दिक्षा घेऊन तथागताच्या बुद्ध धम्माचा स्वीकार केला. तथागताच्या बुद्ध धम्माचा प्रसार व प्रचार करण्यासाठी आंबेडकरी अनुयायांनी पुढाकार घ्यावा. असे आवाहन युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष तथा रिपाइंचे बीड जिल्हाध्यक्ष पप्पू कागदे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंती प्रसंगी मांजरसुंबा, जरूड, आंबे सावळी,



म्हाळसापूर, जवळा, आहेर चिंचोली येथे केले.

पुढे बोलतांना कागदे म्हणाले की, धर्म हा केवळ कायदा किंवा आज्ञा नसाव्यात. ज्या क्षणी धर्माचे रूपांतर कायद्यात होते, त्या क्षणाला तो धर्म भष्टू होतो. खऱ्या अर्थाने धर्म धार्मिक संकल्पनेचा गुणच मारुन टाकतो. जीवन व वास्तव यांच्याकडे बघण्याचा दृष्टीकोण आणि विचारात बदल करणे म्हणजेच धर्मांतर ही डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची भूमिका होती. म्हणूनच दया, क्षमा, शांती व करुणेचा संदेश देणाऱ्या तथागत भगवान गौतम बुद्धाच्या धम्मची नागपूर मुक्कामी लाखो अनुयायांना सोबत घेऊन दिक्षा घेऊन सारा भारत बुद्धमय करण्याचा संकल्प केला होता. आगामी काळात

बुद्ध धम्माचा प्रसार करून धम्म चक्र गतिमान करण्यासाठी आंबेडकरी अनुयायांनी पुढाकार घ्यावा.

यावेळी राजू जोगदंड, किसन तांगडे, सुभाष तांगडे, शाम वीर, विशाल इंगोले, संदिप इंगोले विकास कोरडे, गौतम कोरडे, प्रमोद वाघमारे, बाळासाहेब गव्हाणे,बिभीषण जावळे,रामेश्वर खळगे, भाऊसाहेब कांबळे, देवानंद वाघमारे, अविनाश वाघमारे, नामदेव वाघमारे, महादेव ईनकर, अनंत विद्यागर यांच्यासह शेकडो अनुयायी उपस्थित होते.

# श्री श्री रविशंकर विद्यामंदिरच्या संस्थाचालकांनी दिली बेंगलोर आश्रमाला भेट

**बीड । प्रतिनिधी**

आर्ट ऑफ लिव्हींग आश्रम बेंगलोर व श्री श्री रविशंकर विद्या मंदिर बीड व ट्रस्ट शाळेच्या कामानिमित्त श्री श्री रविशंकर विद्या मंदिरचे अध्यक्ष पारगावकर व सचिव शेख पाशा या दोघांनी बेंगलोर आश्रम मध्ये जाऊन श्री श्री रविशंकर गुरुजी यांची प्रत्यक्ष भेट घेतली आणि या भेटीच्या दरम्यान त्यांनी शाळेची प्रगती, शाळेचे उज्वल भविष्य ,मुलांवरचे संस्कार इत्यादीवर चर्चा करण्यात आली.

श्री श्री रविशंकर गुरुजी यांनी शाळेच्या वर्षभरातील ॲक्टिव्हिटीज मुलांचे क्रीडा कौशल्य अभ्यासक्रमातील व्हिडिओज फोटो पाहिले व विद्यार्थ्यांचे कौतुक केले. याप्रसंगी गुरुजींनी पुढील शैक्षणिक वर्षात बीडच्या शाळेला भेट देण्याचे आश्वासन दिले. अध्यक्ष आणि सचिव यांचे जेव्हा बीडमध्ये आगमन झाले आणि ते शाळेत आले तेव्हा शाळेच्या मुख्याध्यापिका अनिता सूर्यवंशी आणि शाळेतील सर्व शिक्षक वृंद तसेच कर्मचारी वृंद यांनी सरांना पुष्पगुच्छ देऊन त्यांचे स्वागत करण्यात आले. या भेटीचे मनोगत सांगताना सरांनी सांगितलं की बेंगलोर आश्रम येथे त्यांचे कशाप्रकारे आपुलकीने स्वागत करण्यात आले त्याचप्रमाणे राहण्याची सोय ही अतिशय उत्तम होती, गुरुजींसोबत झालेला सत्संग व गुरुजींच्या सानिध्यात केलेली सुदर्शन क्रिया ही अविस्मरणीय होती.

# स्टुडंट पोलीस कॅडेट कार्यक्रमांतर्गत संभाजीनगर परिक्षेत्रातून जिल्हा परिषद माध्यमिक शाळा चौसाळा द्वितीय

**पोलीसांकडून सायबर सुरक्षा व वाहतुकीचे नियम तसेच पोलीस स्टेशनच्या कार्यालयीन कामकाजाची व शस्त्राची माहिती देवून मार्गदर्शन**

**बीड । प्रतिनिधी**

महाराष्ट्र दिनानिमित्त पोलीस ग्राउंड बालेपीर येथे राष्ट्रीय उपक्रमांतर्गत १० शाळांचे मुल्यमापन करण्यात आले होते यामध्ये एकूण १० जिल्हा परिषद शाळांनी सहभाग नोंदविला त्यामध्ये जिल्हा परिषद माध्यमिक शाळा चौसाळा ही शाळा स्टुडंट पोलीस कॅडेट कार्यक्रम अंतर्गत उपक्रमात संभाजीनगर परिक्षेत्रातून द्वितीय आली आहे. याबद्दल शाळेला द्वितीय क्रमाकांचे पारितोषिक क्रिडा शिक्षक अनंत वाघमारे यांचे सहकारी क्रीडा शिक्षक वायभट सर हे उपस्थित होते. विद्यार्थी व विद्यार्थिनी यांचा प्रशस्तीपत्रक व पुष्पगुच्छ देवून राज्यमंत्री इंद्रनिल नाईक (बांधकाम व जलसंधारण) यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.यावेळी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, पोलीस अधिक्षक नवनीत यांची उपस्थिती होती.

हा कार्यक्रम अतिकित्त पोलीस अधिक्षक सचिन यांच्या बहुमुल्य मार्गदर्शनाखाली व



शहर वाहतुक शाखेचे प्रभारी सुभाष यांच्या अधिपत्याखाली नोडल ऑफीसर पोलीस उपनिरीक्षक विजय, सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक उस्मान, पोलीस हवालदार श्रीकांत, शिवदास यांनी परिश्रम घेवून १० जिल्हा परिषद शाळांमध्ये सायबर सुरक्षा व वाहतुकीचे नियम तसेच पोलीस स्टेशनच्या कार्यालयीन कामकाजाची व शस्त्राची माहिती देवून मार्गदर्शन केले व तसेच शारिरीक बाह्यवर्ग प्रशिक्षण दिले.

## जाहीर प्रगटन

**मा.श्री. ओ.एन. मंत्री साहेब, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश, व.स्तर, बीड यांचे न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज ६५८/२०२५**

**प्रणिता भ्र. भास्कर वायभट व ईतर विरुद्ध निरंक**

अर्जदार – १.प्रणिता भ्र. भास्कर वाटभट, वय ४० वर्षे चंदा घरकाम, रा. वाडी, ता.जि. बीड, २. अनिकेत पि भास्कर वायभट, वय २१ वर्षे, धंदा शिक्षण, रा. सदर ३.आदित्य पि. भास्कर, वायभट, वय १८ वर्षे धंदा शिक्षण, रा. सदर,४. चंद्रकला भ्र. भगवान वायभट, वय ७९ वर्षे धंदा – घरकाम, रा. सदर

विरुध्द निरंक

**मागणी– बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.**

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात **मयत भास्कर पि. भगवान वायभट** यांचा मृत्यु झाला, यांचे वारस असल्याबाबत वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज दाखल केला आहे.

ज्याअर्थी मयत भास्कर पि. भगवान वायभट यांचा मृत्यु दिनांक १८/०३/२०२५ रोजी झाला आहे. यांचा मृत्यु वरील अर्जदारा व्यतिरिक्त मयतास इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत.

१. मयत भास्कर पि. भगवान वायभट यांच्या मृत्युनंतर वरील अर्जदारांना शासकीय व निमशासकीय कामासाठी सदर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहू अर्जदार सदरहू मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्यांचे तारखेपासून एक महिन्याचे आत त्यांनी या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार हयाचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहू भास्कर पि. भगवान वायभट यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक ०३/०५/२०२५ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्याने दिले.

सदर प्रकरणाची पुढील तारीख दि. २१/०६/२०२५ आहे.

**(मार्फत– ॲड. डी.डी. मस्के)**

**आदेशावरून.**
**(स्वाक्षरीत)**
**अधीक्षक**
**दिवाणी न्यायालय, व.स्तर, बीड**

**(स्वाक्षरीत)**
**क.लिपीक**

शिक्का

## जाहीर प्रगटन

**कार्यालय, जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग, बीड**

**घर नंबर १–४–१६००, उत्तमनंदा बिल्डींग, पहिला मजला, अंबिका चौक, पांगरी रोड, शाहू नगर, बीड ता. जि. बीड पिन ४३११२२**

**जा.क्र ५५९ दि.२९ /०४/२०२५**

**तक्रार क्रमांक :– ६६६/२०२४**

अर्जदार:– संदिप शेषेराव बड़े विरुध्द

गैरअर्जदार:– १. चेअरमन, ज्ञानराधा मल्टीस्टेट को–ऑप. क्रेडीट सोसायटी लि. मुख्य शाखा ज्ञानराधा भवन जालना रोड, बीड, ता. जि. बीड. मार्फत सुरेश ज्ञानोबाराव कुटे, २. यशवंत वसंतराव कुलकर्णी, व्हाईस चेअरमन (उपध्यक्ष), ज्ञानराधा मल्टीस्टेट को–ऑप. क्रेडिट सोसायटी लि मुख्य शाखा ज्ञानराधा भवन, जालना रोड ता. जि. बीड. ३. शाखा शाखाधिकारी, ज्ञानराधा मल्टीस्टेट को–ऑप. क्रेडीट सोसायटी लि. शाखा–पाटोदा ता. पाटोदा जि. बीड.

वर नमुद तक्रारदार यांना विरुध्द पक्ष यांच्या विरुध्द ग्राहक संरक्षण कायद्यान्वये वर नमुद तक्रार दाखल केलेली आहे. यातील विरुध्द पक्ष यांना नोटीस पाठविली असता ते स्विकारत नाही / पत्ता बदल झाल्यामुळे मिळून येत नाही. म्हणून तक्रारदारांनी केलेल्या विनंतीनुसार या जाहिर नोटीस व्दारे आपणास कळविण्यात येते की विरुद्ध पक्ष यांनी वर नमुद या आयोगाच्या पत्यावर दिनांक ३०/०५/२०२५ रोजी सकाळी १०.३० वाजता स्वता. अगर वकिल किंवा प्राधिकृत प्रतिनिधि मार्फत उपस्थित राहून आपला लेखी जबाब, पुरावा व प्रतिज्ञालेख दाखल करावेत. जर विरुध्द पक्षांनी याकामी कसूर केल्यास मा. आयोगाव्दारे एकतर्फा आदेश पारित करणेत येवुन पुढील कार्यवाही करण्यात येईल याची दखल घ्यावी.

मा. जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग, बीड यांची आदेशानुसार.

दिनांक– २९/०४/२०२५

ठिकाण– बीड

**(मार्फत– ॲड.सचिन खाडे)**

शिक्का

**आदेशावरून.**
**(स्वाक्षरीत)**
**प्रबंधक**
**जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग, बीड**

CMYK
दैनिक ● epaper.marathwadapatra.com
# मराठवाडा पत्र
सोमवार, दि.०५ मे २०२५ पान ४

## कपिलधारवाडी येथे वाघेश्वरीदेवीच्या कलशारोहन वर्धापन दिनानिमित्त किर्तन महोत्सवाचे आयोजन

**बीड । प्रतिनिधी**

इथून जवळच असलेल्या श्री क्षेत्र मन्मथ स्वामी देवस्थान पासून जवळ कपिलधारवाडीचे ग्रामदैवत वाघेश्वरी माता देवीचे मंदिर आहे. या देवीच्या मंदिराच्या दुसर्या कलशारोहण वर्धापन दिनानिमित्त कीर्तन महोत्सवाचे आयोजन महंत ह.भ.प.लक्ष्मण महाराज मेंगडे, श्री महंत ह.भ.प.हरिहारनंद भारती महाराज श्रीक्षेत्र तपोवन मोरेश्वर संस्थान कोळवाडी यांच्या मार्गदर्शनाने व आशीर्वादाने ▶▶ उर्वरित पान २ वर



# आमखास मैदानावर फुटबॉल स्टेडियम होणारच...! उगीच गैरसमज नकोय..!

## सकारात्मक काम करा..समीर काझी यांचे आवाहन





**छ.संभाजीनगर । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ अल्पसंख्याक समाजासाठी पायाभूत सुविधा उपलब्ध करण्यात साठी प्रयत्नशील आहे,आमखास मैदानावर फुटबॉल स्टेडियम व्हावे,म्हणून आम्ही कोणतीही काटकसर सोडणार नाही,माजी खासदार इम्तियाज जलील यांनी या बाबत गैरसमज पसरवू नये,व चांगल्या व सकारात्मक कामात हातभार लावावा, तुम्ही गेल्या दहा वर्षे आमदार -खासदार होता, त्या अनुभवाचा फायदा सम ाजासाठी व्हावा म्हणून आम्हाला मदत करावी, बिनबुडाचे आरोप व राजकारण करू नये, असे आवाहन वक्फ मंडळाचे अध्यक्ष समीर काझी यांनी जलील यांना केले.

जलीलांना उशिरा जाग आली का ?माहीत होतं,तरी राजकारण..

एक मे रोजी काही मेडिया व वर्तमान पत्रात आमखास मैदानावर अल्पसंख्यांक मंत्रालय अंतर्गत अल्पसंख्यांक आयुक्तालय, वक्फ मंडळ व मौलाना आजाद आर्थिक विकास महामंडळाच्या कार्यलयांच्या इमारतीसाठी खोदकाम सुरू केल्याच्या बातम्या प्रकाशित झाल्या.माजी खासदार इम्तियाज जलील यांनी आमखास मैदान व वक्फ कार्यलयात येऊन अधिकाऱ्यांना दम दिला,या वरून शहरात वक्फ मंडळ बाबत गैरसमज पसरला होता.या वरून मंडळाचे अध्यक्ष समीर काझी यांनी तातळीची पत्रकार परिषद घेत प्रकरणाची सत्य बाब उघडकीस आणली.ते म्हणाले ऑगस्ट २०२४ मध्येच माजी अल्पसंख्याक मंत्री अब्दुल सत्तार यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयात बैठक ▶▶ उर्वरित पान २ वर

### ●अजित पवार यांच्या सोबत बैठक,त्रुटी असल्यास चर्चा करू

गेल्या मंगळवारी राज्याचे उपमुख्यमंत्री अजीत पवार यांच्या सोबत अल्पसंख्यांक विभागाची बैठक घेण्यात आली होती.बैठकीत दादांनी वक्फ मंडळ व इतर अल्पसंख्याक विभागांच्या कामकाजात गती आणण्यासाठी निधीची कमकरता भासणार नाही,असे आश्वासन दिले होते.पायाभूत सुविधा साठी ही वाढीव निधी मिळावा म्हणून आम्ही प्रयत्नशील आहोत.येत्या पाच तारखेस मुंबईत परत अजित दादा यांनी बैठक आयोजित केली आहे.वक्फ बोर्डा मार्फत अल्पसंख्यांक समाजाला सुविधा पुरवण्यासाठी आम्ही प्रयत्नशील राहणार आहोत. कामात पारदर्शकता व समाजाचा विकास व्हावा हा आमचा उद्देश आहे. आमखास मैदानावर भव्यदिव्य स्टेडियम व्हावे या साठी आम्ही शासन कडे भरीव निधीची मागणी करू,तसेच वक्फ मंडळा कडून तीनही कार्यलयांना बैठक घेऊन रीतसर परवानगी देऊ,या बाबत अजित दादांशी चर्चा करू, असे अध्यक्ष समीर काझी यांनी सांगितले.

### ●वक्फ मार्फत सर्वांगीण विकास साठी आम्ही प्रयत्नशील

येत्या पन्नास वर्षाचे लक्ष्य समोर ठेवून आम्ही वक्फ बोर्ड इमारत तयार करणार आहोत.मारक्तहवाद वक्फ बोर्डाच्या पणचक्कीत आज ही राज्याचा कारभार चालतो.जागा अपुरी आहेत म्हणून लोकांना सेवा देण्यास अडचणी येतात.त्यासाठी आम्ही राज्यभरात प्रत्येक जिल्ह्यात कार्यालय उभे केले.वक्फ उत्पन्नात दुपटीने वाढ केली.कंत्राटी भरती करून तब्बल शंभर अल्पसंख्याक युवकांना रोजगार दिला.गरीब लोकांना घर मिळावे म्हणून शासन कडे प्रस्ताव सादर केला.बारामती येथे उर्दू शाळेसाठी जागा उपलब्ध करून दिली.मुख्यालयाचे रेकॉर्डरूम अद्यावत केले.बीड येथे मेडिकल कॉलेज व्हावे म्हणून केंद्र व राज्य शासनाला कडे पाठपुरावा केला.गेल्या वर्षीच्या तुलनेत चालू वर्षी तब्बल दिड हजार संस्थांचे नोंदणी प्रकरण मंजूर केले.

## लोकपत्रकार बाप्पासाहेब भांगे एल एम के गौरव पुरस्काराने सन्मानित

**वडवणी । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यातील ऊसतोड मजूर कामगाराचा मुलगा ते एकाच चॅनल चा संपादक. त्याच ऊसतोड मजुरांच्या संघटनेचा राज्य संघटक. असा खडतर प्रवास करत. भांगे यांनी हजार मजुरांचे प्रश्न सोडवले आहेत. त्याबरोबरच अल्पावधीतच लोकप्रिय झालेल्या टीव्ही टेन वादळ वार्ता न्युज या डिजिटल मीडियाच्या माध्यमातून त्यांनी मोठ्या संपादन केला आहे. आणि त्याची पावती त्यांना मि ळाली आहे. लेक माहेरचा कट्टा च्या माध्यमातून मराठवाड्यातील विविध क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी बजावणाऱ्यांना दिले जाणारे पुरस्कार जाहीर

एकमेकींचे सुख आणि दुःख हितगुज सखीसोबत वाटुन घेवूया एकमेकींना साथ देऊया हे ब्रीद वाक्य घेवून लेक माहेरचा कट्टा च्या संस्थापिका सौ . सारिका प्रमोद ढाने यांचे साडेतीन लाख महिलांचे ग्रुप द्वारे संघटन सन २०१८ साली लेक माहेरचा कट्टा या ग्रुपच्या माध्यमातुन आपल्या कांही संचालिका सखींना सोबत



घेवून या ग्रुपच्या संस्थापक / संचालिका सौ. सारिका प्रमोद ढाने यांनी विविध क्षेत्रातील यशस्वी महिलांचे ग्रुपच्या माध्यमातुन संघटन करून त्यांच्यातील सुप्त कला गुणांना वाव देणे , महिलांचे सर्वच क्षेत्रात सक्षीमीकरण करणे या उद्देशने या ग्रुपची सुरुवात केली आज त्याचे रूपांतर एक दोन नव्हे तर तब्बल साडेतीन लाख महिलांचे त्यांनी मोठे संगठन आपल्या कृतत्व कौशल्यातुन उभे केले आहे .

प्रत्येक वर्षी लेक माहेरचा कट्टा आयोजित एल . एम .के. गौरव पुरस्कार सोहळ्याच्या म ाध्यमातुन ग्रुपच्या वतीने राजकीय ,सामाजिक , शैक्षणिक, ▶▶ उर्वरित पान २ वर

## बाजीराव चव्हाण यांच्या कार्यालयास भाजपा नेते राहुल केंद्रे यांची सदिच्छा भेट

**बीड । प्रतिनिधी**

बाजीराव दादा चव्हाण जनसंपर्क कार्यालय,शिवसेना वैद्यकीय मदत कक्ष व धर्मवीर प्रतीष्ठाण कार्यालय बीड येथे भारतीय जनता पार्टीचे नेते व लातूर जिल्हापरिषद चे माजी अध्यक्ष राहुलजी केंद्रे साहेब यांनी सदिच्छा भेट दिली यावेळी बाजीराव दादा यांच्या वतीने हृदय पूर्वक सत्कार करण्यात आला.यावेळी त्यांनी बाजीराव दादा चव्हाण यांच्या बीड येथील



रुग्ण सेवेची व ईतर सामाजिक उपक्रमांची माहिती घेतली असता.बाजीराव दादा चव्हाण यांच्या विषयी मराठवाड्याम ध्ये महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथरावजी शिंदे साहेब यांच्या विचारांना प्रामुख्याने पुढे नेण्याचे काम कोणी करत असेल तर ते बाजीराव दादा आहेत. असे गौरवउद्गार काढले.याप्रसंगी धर्मवीर प्रतिष्ठानचे जिल्हाअध्यक्ष लिंबाजी मामा जाधव, शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाचे जिल्हा प्रमुख महादेव मातकर,युवानेते अण्णा शिंदे,विलास मस्के,प्रसाद चव्हाण,सचिन गाडे, संदीप माने, जोतिराम फरताडे यांच्या सह धर्मवीर प्रतिष्ठानचे सर्व सहकारी व मित्रपरिवार उपस्थित होता.

## श्री चिंतेश्वर विद्यालयात मुक्तछंद उन्हाळी शिबिराचे उद्घाटन

**गेवराई । प्रतिनिधी**

भारतीय शिक्षण प्रसारक संस्था अंबाजोगाई संचलित श्री चिंतेश्वर प्राथमिक व माध्यमिक विद्यालयात मुक्तछंद उन्हाळी शिबीराचे उद्घाटन आज श्री अनिल बोर्डे यांच्या हस्ते संपन्न झाले. प्रसंगी व्यासपीठावर स्थानिक सम न्वय समिती कार्यवाह श्री दत्तात्रय पत्की,शालेय शिक्षण समिती अध्यक्ष श्री अक्षय कुलकर्णी शिशुवाटिका प्रमुख श्रीम.धनश्री ताई पत्की प्राथमिक मुख्याध्यापक



श्री प्रदीप जोशी माध्यमिक मुख्याध्यापक श्री अमोल गोरकर शिबिर प्रमुख श्रीम.राधा माने यांची ▶▶ उर्वरित पान २ वर

## आनंदवनात ग्रीष्मकालीन उन्हाळी योग व क्रीडा प्रशिक्षण शिबिर

**केज । प्रतिनिधी**

चंद्रपूर जिल्ह्यातील वरोरा तालुक्यातील आनंदवनात २५ एप्रिल रोजी सहावे ग्रीष्मकालीन योग व क्रीडा प्रशिक्षण शिबिर प्रारंभ झाला. शिबिराचा तिसरा दिवस रविवार रोजी सकाळी ध्वजारोहण व प्रार्थना घेऊन करण्यात आली. वरोरा पंचायत समिती गटविकास अधिकारी गजानन मुंडकर यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. प्रमुख उपस्थिती पत्रकार डॉ हनुमंत सौदागर,क्रिडा प्रशिक्षक तानाजी बायस्कर आदींची प्रमुख उपस्थिती होती. उन्हाळी शिबिराम ध्ये विविध क्रिडा प्रशिक्षणाचे धडे दिले जाणार आहे. प्रतिवर्षी होणाऱ्या या शिबिरातून शेकडो विद्यार्थ्यांनी पुरस्कार मिळवलेले आहेत. यावेळी बोलतांना गटविकास अधिकारी गजानन मुंडकर म्हणाले अभ्यासबरोबर मैदानी खेळ आवश्यक आहेत. खेळामुळे शरीर निरोगी अन मन प्रसन्न राहते. राज्यभरातून या शिबिरासाठी विद्यार्थी शिबिरार्थी म्हणून येत आहेत. या शिबिराची वाढती व्याप्ती अभिनंदनीय आहे असे मत व्यक्त केले.



# शैक्षणिक व्हिडिओ निर्मिती व नवोपक्रम स्पर्धेत संभाजीनगर जिल्हास्तरावर बीडच्या प्राजक्ता मोरे यांचे दुहेरी यश

**बीड । प्रतिनिधी**

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र पुणे मार्फत आयोजित जिल्हास्तरीय शिक्षकांसाठी दर्जेदार शैक्षणिक व्हिडिओ निर्मिती स्पर्धेमध्ये छत्रपती संभाजीनगर जिल्हास्तरावर इयत्ता ६ ते ८ विषय इंग्रजीमध्ये प्रथम पारितोषिक व शैक्षणिक नव उपक्रम स्पर्धा (इंग्लिश स्टडी एक्सप्रेस) या उपक्रमांमध्ये छत्रपती संभाजीनगर



जिल्हास्तरावर द्वितीय पारितोषिक जिल्हा परिषद प्राथमिक केंद्रीय शाळा मोहरा तालुका गंगापूर येथील शिक्षिका आणि बीड येथील रहिवाशी श्रीमती प्राजक्ता भगवान मोरे यांनी दैदिप्यमान यश प्राप्त केल्याबद्दल शिक्षण व प्रशिक्षण संस्था छत्रपती संभाजीनगर येथे आयोजित बक्षीस वितरण प्रसंगी जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, प्राचार्य श्रीमती सानवी देशमुख, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था छत्रपती संभाजीनगर इत्यादी म ान्यवरांच्या उपस्थितीमध्ये श्रीमती प्राजक्ता भगवान मोरे यांचा प्रम ाणपत्र आणि सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला.

छत्रपती संभाजीनगर येथे शिक्षण अधिकारी माध्यमिक अश्विनी लाटकर, केंद्रप्रमुख डी. टी. शिंदे, मुख्याध्यापक चौधरी सर, शिक्षण विभाग प्रमुख प्रकाश माटे आणि या विद्यालयातील सर्व शिक्षक यांनी अभिनंदन केले असून भविष्यकालीन यशासाठी शुभेच्छा दिल्या आहेत. शैक्षणिक स्पर्धा शिक्षकांच्या नवनिर्मितीच्या क्षमतेला गती देण्यासाठी आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अत्याधुनिक उपक्रम ाला चालना देण्यासाठी उपयुक्त असल्याचे मनोगत मान्यवरांनी व्यक्त केले आहे. श्रीमती प्राजक्ता भगवान मोरे या वाल्मीक शंकरराव वाघमारे यांच्या स्नुशा आणि ▶▶ उर्वरित पान २ वर

asianpaints
रूद्र कलर होम
आमच्याकडे सर्व प्रकारचे
वॉटर कलर, सिमेंट कलर मिळतील.
प्रो.प्रा. योगेश वाघीरे
९१४६७०२३२३
८१४९८०००२०
-: पत्ता : -
राष्ट्रवादी भवनसमोर,
बार्शी रोड, बीड.

CMYK